पिंपरी चिंचवड महानगरपालिका, फ प्रभाग कार्यालय

कार्यपत्रिका क्रमांक १३

सभावृत्तांत

दिनांक:- ११/०३/२०१६ वेळ.दुपारी १२.०० वा.

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची मा."फ" प्रभाग समितीची मासिक सभा दिनांक ११/०३/२०१६ रोजी दुपारी १२.०० वाजता "फ" क्षेत्रीय कार्यालयातील "राजर्षी शाहु महाराज सभागृहात" आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य/सदस्या व स्विकृत सदस्य उपस्थित होते.

१. मा.बो-हाडे शुभांगी संजय सभापती
२. मा.भालेकर शांताराम कोंडीबा उर्फ एस.के.बापू
३. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
४. मा.भालेकर अरुणा दिलीप
५. मा. साने स्वाती प्रमोद
६. मा. सायकर अजय शंकरराव
७. मा.जाधव राहुल गुलाब
८. मा.पवार संगीता शाम
९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ
१०. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित
११. मा.ठाकरे मंदाकिनी अर्जुन
१२. मा. मासुळकर समीर मोरेश्वर
१३. मा.भालेकर पंकज दत्तात्रय
१४. मा.पवार जितेंद्र हनुमंत
१५. मा.भालेकर प्रविण महादेव

याशिवाय श्री. दिलीप गावडे (क्षेत्रीय अधिकारी), श्री. सतिश इंगळे . (कार्यकारी अभियंता स्थापत्य), श्रीमती. प्रभावती गाडेकर, प्र. प्रशासन अधिकारी तथा सभा सचिव, श्री. घोडे पी.ए. (कार्यकारी अभियंता विद्युत) श्री. आडसुळे ए.एन(उप अभियंता विद्युत) श्री. भोसले डी.के. (कनिष्ठ अभियंता विद्युत) , श्री. प्रदीप पुजारी (प्र.कार्यकारी अभियंता जलनि:सारण / उपअभियंता झोनिपू), श्री.नायकवाडी बी.एस. (लेखापाल), श्री.हनुमंत शिंदे उपअभियंता (जलनि:सारण), श्री.नरोटे सुनिलदत्त (उपअभियंता स्था) श्री. विजय शिंदे उपअभियंता (पाणीपुरवठा), श्री.कुलकर्णी एस.एस. (मुख्य आरोग्य निरीक्षक), श्री.माने एस.ए. आरोग्य निरीक्षक, श्री.नंदकिशोर वाघ मुख्य लिपीक, श्री. गिरमकर तुकाराम मुख्य लिपीक, इ. अधिकारी सभेस हजर होते.

**मा. सभापती यांचे संमतीने खालील प्रमाणे विषय ऐनवेळी सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

**विषय क्र.१** फ क्षेत्रीय कार्यालयाचे पाणीपुरवठा सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकामध्ये रजा प्रवासभत्ता या लेखाशिर्षावर सुधारीत तरतुद र.रु १,२३,०००/- फेब्रुवारी २०१६ अखेर संपल्यामुळे प्रवासभत्ता या लेखाशिर्षामधुन रजा प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर र.रु. १५०००/- वर्ग करणेस मान्यता देणेबाबत –

मा. सुरेश म्हेत्रे व मा. राहुल जाधव यांचा प्रस्ताव

पाणीपुरवठा विभागाकडील विषयपत्र क्रं - फक्षेका/पापु/अस्था/कावि/१५९/२०१६ दि. ११/३/२०१६.

**विषय क्र.२** प्रभाग क्र. ११ यमुनानगर मधील **दुर्गानगर चौक ते निगडी या रस्त्यास** व बजाज कंपनीच्या उत्तरेकडील गेटसमोरील रस्त्यास **कै. रुपा राहुल बजाज मार्ग** असे नामकरण करणेबाबत.

मा. सुलभाताई उबाळे व मा. संगीता पवार यांचा प्रस्ताव

**विषय क्र. ३** प्रभाग क्र. ३ चिखली गावचे **पोलिस पाटील कै. पांडुरंग श्रीपती मोरे** यांच्या स्मरणार्थ **पाटीलनगर देहू आळंदी रस्त्यालगतच्या खाजगी मालकी हक्काचे जागेत स्वखर्चाने कमान उभारणीस मंजुरी** देणेबाबत.

मा. दत्तात्रय साने व मा. सुरेश म्हेत्रे यांचा प्रस्ताव.

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय संदर्भात पुढीलप्रमाणे निर्णय घेणेत आले.**

ठराव क्र. ३७ | विषय क्र. १
दि. ११/०३/२०१६ | विभाग : पाणीपुरवठा विभाग
सुचक:- मा. सुरेश म्हेत्रे | अनुमोदक:- मा. राहुल जाधव

संदर्भ:- पाणीपुरवठा विभागाकडील विषयपत्र क्रं - फक्षेका/पापु/अस्था/कावि/१५९/२०१६ दि. ११/३/२०१६.

फ क्षेत्रीय कार्यालयाचे पाणीपुरवठा सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकामध्ये रजा प्रवासभत्ता या लेखाशिर्षावर सन २०१५-२०१६ चे सुधारीत अंदाजपत्रकात तरतुद र.रु. १,२३,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे. माहे फेब्रु-१६ अखेर सदरची तरतुद संपलेने फ पाणीपुरवठा विभागाचे रजा प्रवास भत्ता खर्चासाठी अन्य लेखाशिर्षामधून तरतूद वर्ग करणे आवश्यक आहे.

फ पाणीपुरवठा विभागाकडील सन २०१५-२०१६ चे अंदाजपत्रकामध्ये प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर र.रु. २०,०००/- इतकी तरतूद करणेत आलेली आहे. सदर तरतुर सन २०१५-२०१६ मध्ये खर्ची पडलेली नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ अन्वये एका अर्थसंकल्पीय शिर्षातुन दुस-या अर्थसंकल्पीय शिर्षात बदल करावयाच्या रका, या नियमानुसार बदली करता येतो. सबब प्रवासभत्ता या लेखाशिर्षावरील र.रु. १५०००/- रजा प्रवास भत्ता या लेखाशिर्षावर वर्ग करणेस मान्यता देण्यात येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ३८

दि. ११/०३/२०१६

सुचक:- मा. सुलभाताई उबाळे

विषय क्र.२

विभाग – स्थापत्य विभाग

अनुमोदक:- मा. साधनाताई जाधव

संदर्भ:- मा. सुलभाताई उबाळे व मा. साधनाताई जाधव यांचा दि. ११/३/२०१६ चा प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ११ यमुनानगर मधील दुर्गानगर चौक ते निगडी या रस्त्यास व बजाज कंपनीच्या उत्तरेकडील गेटसमोरील चौक/ रस्त्यास **कै. रुपा राहुल बजाज मार्ग** असे नामकरण करण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्र. ३९

दि. ११/०३/२०१६

सुचक:- मा. सुरेश म्हेत्रे

विषय क्र.३

विभाग – स्थापत्य विभाग

अनुमोदक:- मा. राहुल जाधव

संदर्भ:- मा. दत्ता साने यांचा दि. ११/३/२०१६ चा प्रस्ताव

प्रभाग क्र. ३ चिखली गावचे **पोलिस पाटील कै. पांडुरंग श्रीपती मोरे** यांच्या स्मरणार्थ **पाटीलनगर देहू आळंदी रस्त्यालगतच्या खाजगी मालकी हक्काचे जागेत स्वखर्चाने कमान उभारणीस मंजुरी** देणेबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

यानंतर मा.सभापती यांनी सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहीर केले.

(बो-हाडे शुभांगी संजय)
सभापती
फ प्रभाग समिती

क्रमांक:- फक्षेका/सभा/कावि/३३ /२०१६
दिनांक:- १९/०३/२०१६

(प्रशासन अधिकारी)
सचिव सभाशाखा
फ क्षेत्रीय कार्यालय